प्रेसनोट दिनांक – १६/०५/२०१८

---

**दोन लाख रुपये किंमतीचे यार्कशायर टेरियर परदेशी जातीचे कुत्रे चोरणारा जेरबंद**
**दुकानाचे शटर उचकटुन घरफोडी चोरी तसेच इतर चोरीचे सात गुन्हे केल्याचे उघड**

---

श्री दिपक दामोदर लुटे वय-२१ रा-बालाजीनगर धनकवडी पुणे यांनी त्यांची हिरो होंडा स्प्लेंडर मोटार सायकल नं एमएच२१/डब्लु२४३१ ही वर्धमान हाईटस १३२८ शुक्रवार पेठ पुणे चे समोर कुलुप लावुन पार्क केली असता दिनांक–०१/०५/२०१८ रोजी रात्री - ०९/०० ते दुस-या दिवशी सकाळी ०७/०० वा चे दरम्यान अज्ञात चोरटयाने चोरुन नेली होती त्याबाबत त्यांनी पोलीसांकडे तक्रार दिलेली आहे.

खडक पोलीस स्टेशन पुणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी गुन्हयाचा तपास करत असताना पोलीस कर्मचारी रवि लोखंडे व अशिष चव्हाण यांना खब-याकडुन बातमी मिळाली की अक्षय कांबळे व त्याचे साथीदाराने अनेक ठिकाणी दुकानाचे शटर उचकटुन चो-या व वाहनचोरीचे गुन्हे केले आहेत तो घोरपडे पेठ विजय कदम चौक याठिकाणी येणार आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्याठिकाणी सापळा लावुन दिनांक – १६/०५/२०१८ रोजी सकाळी संशयीत अक्षय शंकर कांबळे वय-१९ रा – ५१२ हरकानगर भवानी पेठ पुणे यास पकडण्यात आलेले आहे. त्याचेकडे सखोल तपास केला असता त्याने त्याचा साथीदार रोहीत सातपुते रा-अप्पर इंदिरानगर अंबिकानगर डेपोजवळ पुणे याचेसह पुणे शहरात मध्य वस्तीमध्ये तसेच कोथरुड, कात्रज परिसरामध्ये दुकानाचे शटर उचकटुन चो-या केल्याची माहीती दिली त्याचप्रमाणे कोथरुड परिसरातील एका दुकानातुन परेदशी जातीचे कुत्रे चोरल्याची माहीती पोलीसांना दिली त्याबाबत त्याचेकडे तपास करुन अप्पर इंदिरानगर बिबवेवाडी पुणे येथील एका घरात लपवुन ठेवलेले **यार्कशायर टेरियर या परदेशी जातीचे कुत्रे ताब्यात घेतले आहे. त्याची किंमत अंदाजे पंच्चेचाळीस हजार रुपये असुन आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत त्या कुत्र्याची किंमत दीड ते दोन लाख रुपये आहे.** श्री रोहित विलास निघोट वय – २५ रा – एनडीओ रोड जिजाई सदन खडकवासला पुणे यांनी फिर्याद दिलेली आहे. त्यांचे भुषण अपार्टमेंट प्रभा हौसिंग सोसायटी मयुर कॉलनी कोथरुड पुणे येथे नील पेट केअर या नावाचे दुकान आहे ते दुकान बंद असताना आरोपींनी शटर उचकटुन तेथील रोख रक्कम व कुत्रे चोरुन नेले होते त्याबाबत त्यांनी कोथरुड पोलीस स्टेशन पुणे येथे तक्रार दिलेली आहे. **यार्कशायर टेरियर कुत्र त्यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.**

**आरोपीकडुन यार्कशायर टेरियर या परदेशी जातीचे कुत्रे, रोख रुपये, एक हिरो होंडा स्प्लेंडर मोटार सायकल असा एकुण अडीच लाख रुपयाचा माल हस्तगत करण्यात आलेला आहे. फरार आरोपी रोहित सातपुते रा - होम कॉलनी कोथरुड पुणे व त्यांचे इतर साथीदार यांचा पोलीस शोध घेत आहेत. आरोपींनी पुणे शहरामध्ये वेगवेगळया अनेक ठिकाणी दुकानाचे शटर उचकटुन चो-या केलेल्या आहेत. त्याचेकडुन घरफोडी चोरीचे चार व वाहनचोरीचा एक असे पाच गुन्हे उघडकीस आलेले आहे अधिक तपास चालु आहे.**

मा. श्रीमती अेस. अेस. मतकर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सहावे न्यायालय पुणे यांचे न्यायालयात आरोपींस हजर केले असता त्यास दिनांक – १९/०५/२०१८ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिलेले आहेत.

सदर कामगिरी परिमंडळ १ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री. बसवराज तेली शहर विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. किशोर नाईक यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र मोकाशी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री संभाजी शिर्के व तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड, आनंत व्यवहारे व तपास पथकातील कर्मचारी सहायक पोलीस फौजदार विजय लोखंडे, रवि लोखंडे, अशिष चव्हाण, अनिकेत बाबर, इम्राण नदाफ, हिम्मत होळकर यांनी केलेली आहे.